शाळांमध्ये मूलभूत सुविधाबाबतचे

निकष ठरविणेबाबत ...

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासननिर्णयक्रमांकः एसएसए-२०१३/प्र.क्र.७५/प्राशि-४

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय , मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २९ जुन, २०१३

**<u>प्रस्तावना -</u>**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. यानुसार, मूलभूत सुविधाबाबतचे निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शाळांमध्ये मूलभूत सुविधाबाबतचे निकष ठरविण्याकरिता दि. १७ नोव्हेंबर, २०१२ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीस महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे अधिकारी तसेच शिक्षण विभागाचे क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये शाळांमध्ये उपलब्ध करावयाच्या मूलभूत सोयी-सुविधांसंदर्भात प्रचलित निकष विचारात घेऊन त्याप्रमाणे सुधारणा करण्याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे काही सुविधांच्या बाबतीत निकष ठरवितांना स्थानिक परिस्थिती व साधनांची उपलब्धता विचारात घेणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शाळांमधील मुलभूत सुविधांचे निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> -**

राज्यातील सर्व शाळांकरिता वर्गखोली, मुलां-मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, संरक्षण भिंत, खेळाचे मैदान, उताराचा रस्ता (रॅम्प), स्वयंपाकगृह, इ. मूलभूत सुविधाबाबतचे निकष पुढीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | सुविधा | प्रचलित निकष | या शासन निर्णयान्वये विहीत केलेले सुधारीत निकष | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छतागृह<br>**अ) मुलींसाठी**<br>• मुतारी<br>• शौचालय | १२० पर्यंत विद्यार्थी पटसंख्या असल्यास -<br>१ युनिट (३ मुता-या, १ शौचालय)<br><br>१२० पेक्षा जास्त पटसंख्या असल्यास,<br>पुढील ८० ते १२० मुलांकरीता १ युनिट देण्यात यावे. | i) ६० विद्यार्थ्यांपर्यंत<br>१ युनिट<br>(२ मुता-या व १ शौचालय)<br>ii) ६० ते १२० विद्यार्थीसंख्या असल्यास,<br>१ युनिट (३ मुता-या,<br>१ शौचालय)<br>iii) पुढील प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे १ अतिरिक्त मुतारी आणि १०० विद्यार्थ्यांमागे १ अतिरिक्त शौचालय. | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शाळा देखभाल दुरुस्ती अनुदानाचा प्राधान्याने वापर स्वच्छतागृहाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता करण्यात यावा.<br>तसेच शाळेच्या उपलब्धतेनुसार तात्पुरते शौचालय किंवा फिरते शौचालय ठेवण्यात यावे. |
| | **ब) मुलांसाठी**<br>• मुतारी<br>• शौचालय | १२० पर्यंत विद्यार्थी पटसंख्या असल्यास -<br>१ युनिट (३ मुता-या,<br>१ शौचालय)<br><br>१२० पेक्षा जास्त विद्यार्थी पटसंख्या असल्यास,<br>पुढील ८० ते १२० मुलांकरीता १ युनिट देण्यात यावे. | i) ६० विद्यार्थ्यांपर्यंत १ युनिट<br>(२ मुता-या व १ शौचालय)<br>ii) ६० ते १२० विद्यार्थीसंख्या असल्यास, १ युनिट (३ मुता-या, १ शौचालय)<br>iii) पुढील प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे १ अतिरिक्त मुतारी आणि १०० विद्यार्थ्यांमागे १ अतिरिक्त शौचालय. | |
| | **क) विशेष गरजा असणा-या (Child with special need)** | १ CWSN शौचालय | १ CWSN शौचालय | विशेष गरजा असणा-या (CWSN) मुलां-मुलींकरिता एकत्रित असलेल्या शौचालयामध्ये कमोड |

| अ. क्र. | सुविधा | प्रचलित निकष | या शासन निर्णयान्वये विहीत केलेले सुधारीत निकष | शेरा |
|---|---|---|---|---|
| | **मुलां-मुलींकरीता एकत्रित** | | | पद्धतीचे भांडे, हँडरेल तसेच रॅम्पची व्यवस्था असावी. |
| २ | पिण्याच्या पाण्याची सुविधा :- (पिण्याच्या पाण्याची उपलब्धता म्हणजे सार्वजनिक पाणी पुरवठा योजना, हातपंप, नदी, तलाव, रेन वॉटर हार्वेस्टिंग, विहिर इ. स्त्रोताद्वारे उपलब्ध होणारे पिण्यायोग्य पाणी) | प्रत्येक शाळेमध्ये किमान २००० लिटर पाण्याची क्षमता असलेली साठवण टाकी असावी व त्यास प्रती ४० विद्यार्थ्यांमागे १ याप्रमाणे नळजोडणी असावी. | गावातील उपलब्ध पाण्याच्या स्त्रोतामधून अन्न शिजविण्यासाठी प्रति विद्यार्थी २ लिटर, स्वच्छतेसाठी प्रति विद्यार्थी ५ लिटर तसेच पिण्याकरिता प्रति विद्यार्थी २ लिटरप्रमाणे पाणी आवश्यक आहे. यानुसार विद्यार्थी संख्या विचारात घेऊन पिण्याच्या पाण्याची साठवण दररोज करावी. गावात सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी उपलब्ध होत असल्यास किंवा नदी / तलाव / बोअरवेलवरुन विद्युत पंपाद्वारे शाळेला पिण्याचे पाणी उपलब्ध होत असल्यास किमान २००० लिटर पाण्याची क्षमता असलेली साठवण टाकी | पिण्याच्या पाण्याकरिता नळ जोडणी ही बालकांची उंची विचारात घेऊन वेगवेगळ्या स्तरावर असावी. कायमस्वरुपी पिण्याचे पाण्याची व्यवस्था नसल्यास तात्पुरत्या स्वरुपात पिण्याचे पाण्याची साठवणूक व्यवस्था पाण्याची टाकी, पिंप व माठ ठेवून करावी पाणी पिण्याकरिता ग्लास, वगराळे, इ. उपलब्ध असावे. पिण्याचे वाया जाणा-या पाण्याचा उपयोग बगीचा करिता करावा किंवा याकरिता वेगळा शोष खड्डा करावा. |

| अ. क्र. | सुविधा | प्रचलित निकष | या शासन निर्णयान्वये विहीत केलेले सुधारीत निकष | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | असावी व पहिल्या ६० विद्यार्थ्यांसाठी किमान २ नळजोडण्या असाव्यात. (IS code ४३३८-१९९०) व त्यापुढील प्रत्येक ३० विद्यार्थ्यासाठी १ नळजोडणी असावी. | |
| ३ | **खेळाचे मैदान** | i. केंद्र शासनाच्या Whole School Development Plan (I.S. Code ८८२७) नुसार प्राथमिक शाळेसाठी ४००० चौ.मी. क्षेत्राचे क्रीडांगण असावे.<br>ii. National Building Code प्रमाणे शाळेकरीता जागा ०.४ हेक्टर (४००० sqm) पैकी क्रीडांगणासाठी २००० चौ.मी. क्षेत्र असावे.<br>iii. केंद्र शासनाच्या दि. २६ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये शाळा व्यवस्थापन समितीने शाळेच्या परिसरात / उद्यानामध्ये बालकांच्या | राष्ट्रीय भवन निर्माण संहिता २००५ अन्वये ५०० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार क्रिडांगणाचे क्षेत्र २००० चौ.मी. इतके असावे तसेच शाळेतील विद्यार्थी संख्या कमी असल्यास १८ मीटर x ३६ मीटर = ६४८ चौ.मी. इतके किमान क्षेत्रफळाचे क्रिडांगण असावे. | शाळेकरिता किमान क्षेत्राचे क्रिडांगण उपलब्ध नसल्यास शाळेच्या आसपास असलेल्या परिसरामध्ये शाळा व्यवस्थापन समितीने बालकांना खेळण्यासाठी संबंधितांकडून (ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, खाजगी मालकीची जागा इ.) ना हरकत प्रमाणपत्र घेऊन तात्पुरत्या स्वरुपात क्रिडांगण उपलब्ध करुन दयावे. |

| अ. क्र. | सुविधा | प्रचलित निकष | या शासन निर्णयान्वये विहीत केलेले सुधारीत निकष | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | खेळण्यासाठी जागा उपलब्ध करणे आवश्यक | | |
| ४ | **आवारभिंत** | SSA Framework नुसार शाळेला प्रवेशद्वारासह आवारभिंत किंवा वनस्पती कुंपण असावे. | i) प्रत्येक शाळेला प्रवेशद्वारासह संरक्षक भिंत असावी.<br>ii) पक्की संरक्षक भिंत शक्य नाही तेथे तारेचे कुंपण, डिडोनिया / मेंहदी सारख्या वनस्पतीचे कुंपण (Green Fencing) असावे.<br>iii) जेथे वाहतूकीचा रस्ता, जंगली श्वापदे, कॅनॉल, ओढा, नदी असे अडथळे आहेत तेथे पक्की संरक्षक भिंत असावी.<br>iv) आवार भिंतीची उंची जमिनीपासून किमान सहा फूट असावी व प्रवेशद्वार १० फूट रूंद असावे.<br>v) शाळेच्या आवारामध्ये निलगिरी, सुरु, गुलमोहर व कडुलिंब यासारख्या मोठ्या झाडांची लागवड सावलीसाठी करावी. | - |

| अ. क्र. | सुविधा | प्रचलित निकष | या शासन निर्णयान्वये विहीत केलेले सुधारीत निकष | शेरा |
|---|---|---|---|---|
| ५ | **स्वयंपाकगृह** | विद्यार्थी पटसंख्या (इ. १ ते ८ वी पर्यंत) १०० पेक्षा कमी असल्यास,<br>Type A – किमान क्षेत्रफळ- ११.९७ चौ.मी. | विद्यार्थी पटसंख्या (इ. १ ते ८ वी पर्यंत) १०० पेक्षा कमी असल्यास,<br>Type A – किमान क्षेत्रफळ- ११.९७ चौ.मी. | . स्वयंपाकगृह हे शाळेच्या मुख्य इमारतीपासून सुरक्षित अंतरावर असावे.<br>• शहरी भागामध्ये जागा उपलब्ध नसल्यास केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा अवलंब करावा |
| | | विद्यार्थी पटसंख्या १०० ते २०० असल्यास,<br>Type B – किमान क्षेत्रफळ -१८.०४ चौ.मी. | विद्यार्थी पटसंख्या १०० ते २०० असल्यास,<br>Type B – किमान क्षेत्रफळ -१८.०४ चौ.मी. | |
| | | २०० पेक्षा जास्त विद्यार्थी पटसंख्या असल्यास,<br>Type C –किमान क्षेत्रफळ -२७.५८ चौ.मी. | २०० पेक्षा जास्त विद्यार्थी पटसंख्या असल्यास,<br>Type C –किमान क्षेत्रफळ -२७.५८ चौ.मी. | |
| ६ | **उताराचा रस्ता (रॅम्प)** | केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान अंतर्गत निकषानुसार उताराच्या रस्त्याचा उतार किमान १:१२ यानुसार असावा. | उताराच्या रस्त्याचा उतार किमान १:१२ यानुसार असावा व पृष्ठभाग हा गुळगुळीत नसावा.<br>उताराच्या रस्त्याची किमान रुंदी १.२ मी. असावी व त्याच्या दोन्ही बाजूला दोन फूट उंचीचे कठडे (Hand rail) असावे. | - |
| ७ | **वर्गखोली** | प्राथमिक - ३० विद्यार्थ्यांकरिता एक वर्गखोली. | केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार प्राथमिक शाळेतील ३० विद्यार्थी | भौगोलिक परिस्थितीनुसार विहित आराखड्याऐवजी |

| अ. क्र. | सुविधा | प्रचलित निकष | या शासन निर्णयान्वये विहीत केलेले सुधारीत निकष | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | उच्च प्राथमिक - ३५ विद्यार्थ्यांकरिता एक वर्गखोली.<br>केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत निकषानुसार प्राथमिक / उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांकरिता विद्यार्थी संख्या विचारात घेऊन स्वतंत्र वर्गखोली असावी. वर्गखोलीमध्ये विद्युतीकरण / Black board किंवा Green board ची सुविधा असावी. | संख्या व उच्च प्राथमिक शाळेतील ३५ विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वर्गखोली (४९० squrefeet carpet area with varandah) असावी. तसेच वर्गखोलीचे बांधकाम पक्के असावे व वर्गखोलीत विद्युतीकरण व फळा तसेच खेळती हवा राहणेस्तव पुरेश्या खिडक्या असाव्यात.<br>सर्व वर्गखोल्यांचे बांधकाम पक्के व भूकंपरोधक (R.C.C. frame structure) असणे आवश्यक असून छत पक्के (R.C.C. Slab) असावे. | जिल्ह्याने स्वतंत्रपणे सादर केलेल्या बांधकाम आराखड्यास राज्य शासन व केंद्र शासनाच्या मान्यतेने मंजूरी देता येईल. |

उपरोक्त नमूद मुलभूत सोयी सुविधा सोबत प्रत्येक शाळेमध्ये किमान दोन किंवा प्रत्येक वर्गखोलीकरिता एक याप्रमाणे अग्नीशमन यंत्रे उपलब्ध करावी. तसेच, प्रत्येक शाळेमध्ये एक वैद्यकिय प्रथमोपचार पेटी उपलब्ध असावी. सदर अग्नीशमन यंत्राची व वैद्यकीय प्रथमोपचार पेटीची तपासणी दर तीन महिन्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथ.) व शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी प्राधिकृत

केलेल्या अधिका-यामार्फत करावी. उपरोक्त निकष हे राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळाकरिता लागू राहतील,

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६२९१७१५०२७७२१असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.07.02 13:54:30 +05'30'

**(ना.ऊ.रौराळे)**

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री / उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
४. मा.मंत्री /राज्यमंत्री शालेय शिक्षण यंाचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विधानसभा /विधानपरिषद सदस्य, विधान भवन, मुंबई.
६. मंत्रालयीन विभाग (सर्व)
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१०.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

११.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद

१२.अधिदान व लेखाधिकारी, बृहन्मुंबई.

१३.निवासी लेखाधिकारी, मुंबई

१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर.

१५.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर.

प्रत,

निवड नस्ती, प्राशि-४